पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/४/कावि/९८/२०१०
दिनांक : २५/२/२०१०

प्रति,

मा..................................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक ५/३/२०१० रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ५/३/२०१० रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : १) सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा. विधी समिती

**<u>कार्यपत्रिका क्रमांक : १७</u>**

दिनांक : ५/३/२०१० वेळ : दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक ५/३/२०१० रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक :- १) डॉ.श्रीम.पुनम अशोक भंगाळे यांनी महानगरपालिका सेवेमधील वैद्यकिय अधिकारी या पदाचा दिलेला राजीनामा मंजुर करुन त्यांनी महानगरपालिकेमध्ये तारण ठेवलेले र.रु. १०,०००/- चे राष्ट्रीय बचतपत्र जप्त करुन सदरची रक्कम महानगरपालिका कोषागारात जमा करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- २) खातेनिहाय चौकशीचा निर्णय दीर्घकाळ प्रलंबित असल्याने आणि मा.स्थायी समितीने श्री.अडागळे फुलचंद गिरजा - गटरकुली यांना सेवेतुन कमी करण्यास मान्यता दिली नसल्याने व सद्यस्थितीत श्री.अडागळे यांच्या मोठया प्रमाणातील गैरहजेरीमुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम १९७९ च्या नियम ५ (सात) नुसार श्री.फुलचंद गिरजा अडागळे - गटरकुली यांना सक्तीने सेवानिवृत्त करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ३) वॉर्ड क्र.३४ गांधीनगर व इतर आवश्यक ठिकाणी पाईपलाईन टाकणेकामी र.रु.४३,१३,९७४/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/९८/१०
दिनांक : २५/०२/१० चे लगत
टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.